RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक ६८] बुधवार, जून ७, २०१७/ज्येष्ठ १७, शके १९३९ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक १४५

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ जून २०१७

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीपीए. ०४१७/ प्र.क्र.७१/ राउशु - २.—ज्याअर्थी, विशेष परवाने व अनुज्ञप्त्या नियम, १९५२ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिद्धीशिवाय हे नियम करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ब), (ग) आणि (ह१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन,याद्वारे पुढील नियम करीत आहे :—

**१.** या नियमांना नियम “ विशेष परवाने व अनुज्ञप्त्या (सुधारणा) नियम, २०१७ ” असे संबोधण्यात यावे.

**२.** विशेष परवाने आणि अनुज्ञप्त्या नियम, १९५२ (यापुढे यास प्रधान नियम असे संबोधावे) च्या नियम ५ मधील

(एक) खंड (अ) मध्ये —

(अ) उप-खंड (एक) मध्ये “ किंवा कोणत्याही राष्ट्रीय किंवा राज्य महामार्गाच्या सीमेपासून ” हे शब्द वगळण्यात येतील ;

(ब) उप-खंड (एक) नंतर पुढील उप-खंड समाविष्ट करण्यात यावा, जसे की :—

“ (एक अ) जे एखाद्या राष्ट्रीय किंवा राज्य महामार्गाच्या कडेपासून किंवा राष्ट्रीय किंवा राज्य महामार्गाच्या संलग्न विद्यमान सेवा रस्ता असल्यास त्याच्या कडेपासून २०,००० लोकसंख्येपेक्षा अधिक नसेल अशा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीत २२० मीटरच्या अंतराच्या आत आणि जर इतरत्र स्थित असेल तर ५०० मीटर अंतराच्या आत. ”

(क) अस्तित्वात असलेल्या परंतुकानुसार खालील परंतुक अंतर्भूत करण्यात यावा, जसे की :—

" आणखी असे की, विशेष परवाने आणि अनुज्ञप्त्या (सुधारणा) नियम, २०१७ च्या प्रारंभानंतर कोणत्याही वेळी जर असे आढळून आले की, जर कोणत्याही २०,००० लोकसंख्येपेक्षा अधिक नसेल अशा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीत २२० मीटरच्या अंतराच्या आत आणि इतरत्र, कोणत्याही राष्ट्रीय किंवा राज्य महामार्गाच्या कडेपासून किंवा राष्ट्रीय किंवा राज्य महामार्गाशी संलग्न सेवा रस्ता असल्यास अशा रस्त्याच्या कडेपासून ५०० मीटर अंतराच्या आत असलेली अनुज्ञप्ती तात्काळ रद्द होईल."

(दोन) स्पष्टीकरणामधील परिच्छेद (तीन) मध्ये खंड (क) ऐवजी पुढील खंड अंतर्भूत करण्यात यावा, जसे की :—

" (क) कोणत्याही राष्ट्रीय किंवा राज्य महामार्गाच्या कडेपासून, किंवा राष्ट्रीय किंवा राज्य महामार्गाशी संलग्न सेवा रस्ता असल्यास अशा रस्त्याच्या कडेपासून."

**३.** मध्ये प्रधान नियमांच्या नियम ५ अ च्या उप-नियम (४) मध्ये,—

(एक) खंड (क) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात यावा, जसे की :—

" (क १) जे एखादया राष्ट्रीय किंवा राज्य महामार्गाच्या कडेपासून किंवा राष्ट्रीय किंवा राज्य महामार्गाच्या संलग्न विद्यमान सेवा रस्ता असल्यास त्याच्या कडेपासून २०,००० लोकसंख्येपेक्षा अधिक नसेल अशा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीत २२० मीटरच्या अंतराच्या आत आणि जर इतरत्र स्थित असेल तर ५०० मीटर अंतराच्या आत."

(दोन) अस्तित्वात असलेल्या परंतुकानुसार खालील परंतुक अंतर्भूत करण्यात यावा, जसे की,

" आणखी असे की, विशेष परवाने आणि अनुज्ञप्त्या (सुधारणा) नियम, २०१७ च्या प्रारंभानंतर कोणत्याही वेळी जर असे आढळून आले की, जर कोणत्याही २०,००० लोकसंख्येपेक्षा अधिक नसेल अशा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीत २२० मीटरच्या अंतराच्या आत आणि इतरत्र, कोणत्याही राष्ट्रीय किंवा राज्य महामार्गाच्या कडेपासून किंवा राष्ट्रीय किंवा राज्य महामार्गाशी संलग्न सेवा रस्ता असल्यास अशा रस्त्याच्या कडेपासून ५०० मीटर अंतराच्या आत असलेली अनुज्ञप्ती तात्काळ रद्द होईल."

(तीन) स्पष्टीकरणामधील परिच्छेद (तीन) मध्ये—

(एक) " खंड (ब) किंवा (क) मध्ये निर्दिष्ट केलेले अंतर " या शब्दांमध्ये " खंड (ब) किंवा (क) " या शब्दांनंतर पुढील शब्द समाविष्ट करण्यात येतील " किंवा (क १). "

(दोन) खंड (ब) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात यावा, जसे की :—

" (क) कोणत्याही राष्ट्रीय किंवा राज्य महामार्गाच्या कडेपासून, किंवा राष्ट्रीय किंवा राज्य महामार्गाशी संलग्न सेवा रस्ता असल्यास अशा रस्त्याच्या कडेपासून.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. हि. वागदे,**
शासनाचे सहसचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 6th June 2017

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. BPA. 0417 /CR-71/EXC-2.—Whereas, the Government of Maharashtra consider it expedient that the following rules further to amend the Special Permit and Licences Rules, 1952 should be brought into force at once, and therefore the rule should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949);

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (*b*), (*g*) and (*h1*) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Special Permits and Licences Rules, 1952, as follows, namely :—

1. These rules may be called the Special Permits and Licences (Amendment) Rules, 2017.

2. In rule 5 of the Special Permits and Licences Rules, 1952 (hereinafter referred to as "the principal Rules"), in sub-rule (*3*),—

*(i)* in clause (*a*),—

(*a*) in sub-clause (*i*), the words "or from the boundary of any National or State Highway" shall be deleted;

(*b*) after sub-clause (*i*), the following sub-clause shall be inserted, namely :—

" (*ia*) which, if situated in areas within the jurisdiction of any local Self-Government body having population not exceeding 20,000, is within a distance of two hundred and twenty metres and if situated elsewhere, within a distance of five hundred metres from the edge of any National or State Highway, or in case of any existing service road then the distance from the edge of such service road adjacent to the National or State Highway;";

(*c*) after the existing proviso, the following proviso shall be inserted, namely :—

"Provided further that, if at any time after the commencement of the Special Permits and Licences (Amendment) Rules, 2017 it is observed that, if any shop is situated in areas within the jurisdiction of any local Self-Government body having population not exceeding 20,000, is within a distance of two hundred and twenty metres and if situated elsewhere, within a distance of five hundred metres from the edge of any National or State Highway, or in case of any existing service road then the distance from the edge of such service road adjacent to the National or State Highway, the licence shall stand cancelled forthwith.";

(*ii*) in the *Explanation,* in para (*iii*), for clause (*c*), the following clause shall be substituted, namely:—

"(*c*) the edge of any National or State Highway, or in case of any existing service road then from the edge of such service road adjacent to the National or State Highway,".

3. In rule 5A of the principal Rules, in sub-rule (4),—

(*i*) after clause (*c*), the following clause shall be inserted, namely :—

"(*c1*) which is situated in areas within the jurisdiction of any local Self-Government body having population not exceeding 20,000, is within a distance of two hundred and twenty metres and if situated elsewhere, within a distance of five hundred metres from the edge of any National or State Highway, or in case of any existing service road then the distance from the edge of such service road adjacent to the National or State Highway."

*(ii)* after the existing proviso, the following proviso shall be inserted, namely :—

"Provided further that, if at any time after the commencement of Rules, 2017 it is observed that, if any shop is situated in areas within the jurisdiction of any local Self-Government body having population not exceeding 20,000, is within a distance of two hundred and twenty metres and if situated elsewhere, within a distance of five hundred metres from the edge of any National or State Highway, or in case of any existing service road then the distance from the edge of such service road adjacent to the National or State Highway, the licence shall cancelled forthwith.".

(*iii*) In the *Explanation*, in para (*iii*),—

(*i*) after the words "the distance referred to in clause (*b*) or (*c*)" the words "or (*c1*)" shall be inserted;

(*ii*) after clause *(b)*, the following clause shall inserted, namely :—

"(*c*) the edge of any National or State Highway, or in case of any existing service road then from the edge of such service road adjacent to the National or State Highway".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. H. WAGDE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.